# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय जा.क्र. :** अम/सका- ०३ **दिनांक : २५-०९-२०२०.**

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना (ऑनलाईन ॲप व्दारे)

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित ५ (पाच) सदस्यांची नियुक्ती साठी)

**सभा क्रमांक ०३, गुरुवार दिनांक ०१/१०/२०२०**

प्रति,

सन्मा.श्री. / श्रीमती......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **गुरुवार दिनांक ०१/१०/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता** नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील राजमाता जिजाऊ सभागृहात ऑनलाईन ॲप व्दारे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

तरी आपणांस सदर सभेस ॲप व्दारे ऑनलाईन सहभागी होण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप :-** १) प्रत्येक सदस्याने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरुन AMC Corporator official What's App मध्ये निर्देश दिल्यानुसार ॲप डाउन लोड करुन घेणे.
२) वरिलप्रमाणे ॲप व्दारे प्रत्येक सदस्यांना मा.महासभेस उपस्थित राहता येईल.
३) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये व दिनांक ०९ सप्टेंबर २०२० च्या पत्रान्वये कळविले नुसार सदरची सभा ऑनलाईन ॲप व्दारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा. सदस्यांनी महानगरपालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

सभा क्रमांक ०३ गुरुवार दिनांक ०१ / १० / २०२० रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये व दिनांक ०९ सप्टेंबर २०२० च्या पत्रान्वये ऑनलाईन ॲप व्दारे होणा-या विशेष सभेची विषय पत्रिका.

**-- * --**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| २० | अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित ५ (पाच) सदस्यांची नियुक्ती करणे बाबत... |

मा.महापौर सो यांचे मान्यतेने.
दिनांक : २५ /०९/२०२०.

प्र.नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २०** **दिनांक : ०१ /१०/२०२०.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित ५ (पाच) सदस्यांची नियुक्ती करणे बाबत...

-- ** --

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचे जा.क्र.३६ दिनांक ११/०६/२०२० रोजीचे पत्र.

संदर्भांकित पत्रान्वये मा.महापौर साहेब यांनी दिलेल्या आदेशानुसार विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या ) नियम २०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिके मध्ये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे सदस्यपदी नेमण्याची तरतुद आहे.

**उपरोक्त उल्लेखित केलेल्या नियमामधील पुढील नियम क्रमांकानुसार :-**

**३. पालिका सदस्यांच्या नामनिर्देशनासाठी बैठक घेणे :-** नियम ४ मधील तरतुदीस अधीन राहून सार्वत्रिक निवडणूकी नंतर महानगरपालिकेच्या पहिल्या बैठकीत महापौर आणि उपमहापौर यांची निवडणूक झालेनंतर पाच व्यक्तींचे नामनिर्देशन नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणुन महानगरपालिका करील.

**४. नामनिर्देशनासाठी अर्हता :-** एखाद्या व्यक्तीकडे पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान अथवा अनुभव असेल ती व्यक्ती नामनिर्देशित पालिका सदस्याच्या पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशीत केली जाण्यास पात्र असेल, जर ती व्यक्ती -,

**(क)** राज्यात मान्यताप्राप्त व नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी म्हणून किमान पाच वर्षे काम केलेली असेल, किंवा

**(ख)** किमान पाच वर्ष शिक्षणतज्ज्ञ म्हणून काम केलेली असेल, यामध्ये मान्यताप्राप्त शाळा किंवा महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापक, व्याख्याता, मुख्याध्यापक यांचा समावेश असेल, किंवा

**(ग)** सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल म्हणून कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव धारण केलेली असेल, किंवा

**(घ)** कमीत कमी पाच वर्षांचा व्यावसायिक अनुभव असलेली मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवीधारक असेल, किंवा

**(ड)** राज्यात कमीत कमी पाच वर्षाकरीता अभिवक्ता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्यामधील पदवी धारक व राज्यात विधी क्षेत्रात काम करण्याचा कमीत कमी पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल, किंवा

**(च)** नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त किंवा उपायुक्त म्हणून काम करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली किंवा ती किमान दोन वर्षांचा अनुभव असलेली महानगरपालिकेतून आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालेली असेल, किंवा

**(छ)** महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रात कार्यरत असणा-या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेची पदाधिकारी म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल.

**५. " पालिका सदस्यांचे नामनिर्देशन -- (१)** पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी, आयुक्त, महानगरपालिकेतील सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि प्रत्येक मान्यताप्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षांच्या किंवा गटांच्या नेत्याशी विचारविनिमय करुन आणि अशा पक्षांचे आणि गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन, महानगरपालिकेला योग्य व्यक्तींच्या नावाची नामनिर्देशित सदस्य म्हणुन नेमणूक करण्यासाठी शिफारस करतील. अशा विचारपूस केलेल्या व्यक्तींची संख्या नियम ३ प्रमाणे शिफारस करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक नसावी.

परंतु, मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ विचारात घेउन नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यासाठी शिफारस करतांना यथास्थिती मुंबई महानगरपालिका अधिनियम, १९४९ याचे कलम ३१ अ मधील तरतुदीनुसार बनविलेल्या मान्यताप्राप्त अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे फ्रंटचे तौलनिक संख्याबळानुसार आयुक्त, प्रथम नामनिर्देशित सदस्य म्हणुन नामनिर्देशनासाठी पुर्णांक विचारात घेईल आणि त्यानंतरही जर एक किंवा अधिक जागा शिल्लक राहिल्यास अपुर्णांकामध्ये ज्या मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्षाची किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे संख्याबळ सर्वात जास्त आहे, तेथून सुरुवात करुन उतरत्या क्रमाने उर्वरीत जागांचे वाटप पुर्ण करेल :

परंतु, आणखी असे की, वरील परंतुकात नमूद केल्यानुसार अपूर्णांकातील संख्याबळ उतरत्या क्रमाने विचारात घेउन नावांचे नामनिर्देशन करतांना, जर दोन किंवा अधिक मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडीची किंवा फ्रंटची अपूर्णांकांतील संख्या सारखीच असल्यास, आयुक्त, अशा मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंटमधुन नामनिर्देशित सदस्यांची शिफारस करण्यासाठी निवड, अशा सर्व संबंधित पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंटच्या उपस्थितीत चिठ्ठया टाकुन करील.

**(२)** आयुक्तांनी केलेल्या शिफारशींचा विचार करुन महानगरपालिका, पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु आयुक्तांनी अशाप्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तीची शिफारस महानगरपालिकेने अमान्य करावयाची ठरविल्यास त्याबाबतची कारणे महानगरपालिकेला नोंद करावी लागतील.:

परंतु आणखी असे की, नियम ४ मधील (क) ते (छ) मधील अर्हता असणा-या या प्रत्येकी एका व्यक्तीची पालिका सदस्य म्हणून नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

**६. पालिकेतील नामनिर्देशित सदस्यांची नांवे प्रसिध्द करणे :-** याप्रमाणे नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची नावे शक्य तितक्या लवकर पालिका सचिव, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठवील.

**७. प्रासंगिक रिक्त पदे :-** नामनिर्देशित पालिका सदस्याचे एखादे पद रिक्त होईल तेव्हा ते रिक्त पद भरण्याकरिता या नियमांच्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

**८. नामनिर्देशित पालिका सदस्यांना प्रमाणपत्र देणे :-** नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर आयुक्त, यासोबत जोडलेल्या नमुन्यात प्रत्येक नामनिर्देशित पालिका सदस्यांना प्रमाणपत्र देईल. असे नियम आहेत.

उपरोक्त नियमाप्रमाणे नियम क्रमांक ३ नुसार ५ (पाच) नामनिर्देशित सदस्यांची नेमणूक करणेसाठी शिफारस करावी लागेल.

वरील तरतुदी प्रमाणे मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.२०१८/नपा-१/२/गटनोंदणी/२१९६७/७१३० दिनांक २७/१२/२०१८ च्या आदेशान्वये कॉग्रेस आघाडी या ५ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन सौ.सुप्रिया धनंजय जाधव यांचे नांव नमुद केले आहे.

मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.२०१८/नपा-१/२/गटनोंदणी/ २१९७०/७१३१ दिनांक २७/१२/२०१८ च्या आदेशान्वये नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी या १९ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.संपत विजय बारस्कर यांचे नांव नमुद केले आहे.

मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.२०१८/नपा-१/२/गटनोंदणी/ २१९७१/७१३२ दिनांक २७/१२/२०१८ च्या आदेशान्वये बहुजन समाज पार्टी, या ४ नगरसेवकांच्या गटांस मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.शेख मुदस्सर जहांगिर यांचे नांव नमुद केले आहे.

मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र. २०१८/नपा-१/२/गटनोंदणी/२१९७३/७१३३ दिनांक २७/१२/२०१८ च्या आदेशान्वये शिवसेना, अहमदनगर महानगरपालिका या पक्षातील २४ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन श्री.रोहिणी संजय शेंडगे यांचे नांव नमुद केले आहे.

मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी त्यांचे पत्र क्र.२०१८/नपा-१/२/गटनोंदणी/२१९७५/७१३४ दिनांक २७/१२/२०१८ च्या आदेशान्वये भारतीय जनता पार्टी, अहमदनगर महानगरपालिका यांच्या १४ नगरसेवकांच्या गटनोंदणीसाठी मान्यता दिली असुन, गटनेते म्हणुन सौ.मालन सुरेश ढोणे यांचे नांव नमुद केले आहे.

श्री.शेख मुदस्सर जहाँगिर यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३१ अ अन्वये बहुजन समाज पार्टी - समाजवादी पार्टी - अपक्ष मनपा आघाडी स्थापन करुन गटनोंदणी करणेकामी दिनांक ०९/०१/२०१९ रोजी प्रस्ताव दाखल केला होता. तथापि विभागीय आयुक्त, नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक २०१९/नपा-१/२/जा.क्र.३४१० दिनांक २३/०१/२०१९ अन्वये "श्री.शेख मुदस्सर जहांगिर यांनी महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८७ च्या तरतुदीनुसार यापुर्वीच बहुजन समाज पार्टी या पक्षाची गटनोंदणी केली असल्याने त्यांनी दिनांक ०९/०१/२०१९ रोजी सादर केलेल्या प्रस्तावानुसार नोंदणीची पुनरुक्ती करता येणार नाही. सबब बहुजन समाज पार्टी - समाज वादी पार्टी -अपक्ष महानगरपालिका आघाडीचा दिनांक ०९/०१/२०१९ रोजीचा प्रस्ताव निकाली काढण्यांत येत आहे. " असा आदेश पारीत केलेला आहे. राजपत्रामध्ये प्रसिध्दी झाल्याप्रमाणे परिस्थिती विचारात घ्यावी लागेल.

उपरोक्त प्रमाणे नामनिर्देशित पाच (५) सदस्यांची सदस्यपदी नियुक्ती करावयाची झाल्यास पक्षनिहाय सदस्य नियुक्ती बाबतचा तक्ता खालील प्रमाणे.

अ) एकुण सदस्य संख्या - ६८
ब) नियुक्त करावयाची सदस्य संख्या - ०५

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६८ ÷ ०५ = १३.६**

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शिवसेना | २४ ÷ | १३.६ | १.७६ | १ | १ | २ |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी | १९ ÷ | १३.६ | १.३९ | १ | १ | २ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १४ ÷ | १३.६ | १.०२ | १ | -- | १ |
| ४ | कॉग्रेस आघाडी | ५ ÷ | १३.६ | ०.३६ | -- | -- | -- |
| ५ | बहुजन समाज पार्टी | ४ ÷ | १३.६ | ०.२९ | -- | -- | -- |
| ६ | समाजवादी पार्टी | १ ÷ | १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ | १३.६ | ०.०७ | -- | -- | -- |
| | एकुण | | | | ३ | २ | ५ |

अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ अ च्या सदस्या सौ.सारिका हनुमंत भुतकर यांचे अनुसूचीत जमातीचे प्रमाणपत्र मा.सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचीत जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांनी रद्द केल्यामुळे साप्रवि/निवडणूक ५४१ दिनांक ०९/१२/२०१९ अन्वये त्यांचे पद भूतलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक १०/१२/२०१८ पासुन रद्द करण्यांत आलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ अ ची पोट निवडणूक-२०२० दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२० रोजी पार पडली असुन दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२० रोजी निकाल जाहीर झालेला असून त्यामध्ये जाधव पल्लवी दत्तात्रय, ह्या सदर प्रभागातुन भारतीय जनता पार्टी या पक्षामार्फत निवडून आलेल्या आहेत तसेच त्यांचे नांव शासन राजपत्रात प्रसिध्द झाले असुन भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्या सौ.मालनताई सुरेश ढोणे, यांनी महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण अनर्हता नियम, १९८७ मधील तरतुदी नुसार मा.विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे नोंदणी केलेली आहे. तसेच उपसचिव, महाराष्ट्र शासन यांचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० अन्वये श्री.श्रीपाद शंकर छिंदम यांचे अहमदनगर महानगरपालिकेतील विद्यमान नगरसेवक पद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १३(१) नुसार रद्द करण्यांत आले आहे. त्यामुळे ६७ सदस्यांच्या संख्येनुसार सदस्यमूल्य काढावे लागेल.

अ) एकुण सदस्य संख्या - ६७

ब) नियुक्त करावयाची सदस्य संख्या - ०५

**क) एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६७ ÷ ०५ = १३.४**

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ | सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या प्रथम स्तर | नियुक्त सदस्य संख्या व्दितीय स्तर | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शिवसेना | २३ ÷ | १३.४ | १.७१ | १ | १ | २ |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी | १९ ÷ | १३.४ | १.४१ | १ | १ | २ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १४ ÷ | १३.४ | १.०४ | १ | -- | १ |
| ४ | कॉग्रेस आघाडी | ५ ÷ | १३.४ | ०.३७ | -- | -- | -- |
| ५ | बहुजन समाज पार्टी | ४ ÷ | १३.४ | ०.२९ | -- | -- | -- |
| ६ | समाजवादी पार्टी | १ ÷ | १३.४ | ०.०७ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ | १३.४ | ०.०७ | -- | -- | -- |
| | एकुण | | | | ३ | २ | ५ |

तरी उपरोक्त अ.नं. १ ते ३ प्रमाणे प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवून नामनिर्देशनाव्दारे सदस्यांची नियुक्ती महानगरपालिका सभेच्या निर्णयाव्दारे ठरविणे आवश्यक असल्यामुळे मा.महानगरपालिकेची विशेष सभा बोलाविणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावयाची झाल्यास सदरील प्रस्तावावर निर्णय घेणेकरीता मा.महापौर साहेब यांचेकडून महासभेची तारीख प्राप्त झालेवर सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता, संबंधित पक्षांचे गटनेते यांना त्यांच्या गटाच्या संख्या बलाबाबत कळवुन मा.नामनिर्देशित सदस्य पदासाठी आवश्यक त्या संख्येच्या सदस्यांचे नामनिर्देशन पत्र मा.महासभेपुढे सादर करणे बाबत कळवावे लागेल.

तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेच्या मंजूरीस पाठविणे, त्याचप्रमाणे मा.महापौर साहेब यांनी मा.महासभेची तारीख निश्‍चित केलेनंतर संबंधित पक्षाचे गटनेते यांना नामनिर्देशित सदस्य पदासाठी मा.सदस्यांचे नावाचे नामनिर्देशन नियुक्ती पत्र मा.महासभेपुढे सादर करणे बाबत कळविणेस्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, उक्त प्रकरणी नगरविकास व मा.शासन परिपत्रकाप्रमाणे निश्चीत केले प्रमाणे कार्यवाहीस ठेवणे बाबत कळविलेबाबत.

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** सभेचे कामकाज सुरु करा.

**मा.आयुक्त साहेब :-** पाच बंद पाकीटांची छाननी करण्यांत आली असुन छाननी मध्ये १) श्री. मदन संपत आढाव, २) शेळके संग्राम बबनराव, ३) शेटीया विपुल मुलचंद, यांचेवर गुन्हा दाखल असुन दोष सिध्द अद्याप झालेला नाही. पाच सदस्यांची शिफारस करीत आहे.

**---*---**

**ठराव :-**

ठरविण्यांत येते की, मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडे प्राप्त वैध पाच नामनिर्देशन खालील प्रमाणे असुन त्यांना **मा.नामनिर्देशित सदस्य पदी** विधीग्राहयरित्या नामनिर्देशित झाल्याचे मी घोषित करीत आहे.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | मा.श्री.मदन संपत आढाव | शिवसेना |
| २ | मा.श्री.शेळके संग्राम बबनराव | शिवसेना |
| ३ | मा.श्री.रामदास नानाभाऊ आंधळे | भारतीय जनता पार्टी |
| ४ | मा.श्री.शेटीया विपुल मुलचंद | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी आघाडी |
| ५ | मा.श्री.राजु आसाराम कातोरे | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी आघाडी |

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.श्री.मनोज शंकर कोतकर

ठराव मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
नगरसचिव विभाग.     दिनांक : ०३/०१/२०२०.

फेरसादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेमध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व देवुन नामनिर्देशनाव्दारे नामनिर्देशित ५ (पाच) सदस्यांची नियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव मा.महापौर साहेब यांचेकडेस दिनांक २३-१-२०१९ रोजी प्रस्ताव मा.आयुक्त साो यांचे स्वाक्षरीने प्रशासनामार्फत पाठविणेत आलेला होता.

अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ अ च्या सदस्या सौ.सारिका हनुमंत भुतकर यांचे अनुसूचीत जमातीचे प्रमाणपत्र मा.सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचीत जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नाशिक यांनी रद्द केल्यामूळे साप्रवि/निवडणूक ५४१ दिनांक ०९/१२/२०१९ अन्वये त्यांचे पद भूतलक्षी प्रभावाने म्हणजेच दिनांक १०/१२/२०१८ पासुन रद्द करण्यांत आलेले आहे.

मा.महापौर साहेब यांनी आज म्हणजेच दिनांक ३-१-२०२० रोजी ६७ सदस्यांच्या संख्येनुसार सदस्यमुल्य काढून फेरसादर करणेबाबत आदेशीत केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या एकुण ६७ सदस्य असल्याने सदस्यांचे सदस्यमूल्य खालील प्रमाणे

**एकुण सदस्य संख्या ÷ नियुक्त सदस्य संख्या = प्रती सदस्य मुल्य.**

**६७ ÷ ०५ = १३.४**

| अ. नं. | पक्ष | संख्या बळ सदस्य मुल्य | पक्ष निहाय सदस्य मुल्य | नियुक्त सदस्य संख्या | | पक्ष निहाय नियुक्त करावयाची सदस्य संख्या. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रथम स्तर | व्दितीय स्तर | |
| **१** | **२** | **३ ४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | शिवसेना | २३ ÷ १३.४ | १.७१ | १ | १ | २ |
| २ | नॅशनॅलिस्ट कॉग्रेस पार्टी, आघाडी | १९ ÷ १३.४ | १.४१ | १ | १ | २ |
| ३ | भारतीय जनता पार्टी | १४ ÷ १३.४ | १.०४ | १ | -- | १ |
| ४ | कॉग्रेस आघाडी | ५ ÷ १३.४ | ०.३७ | -- | -- | -- |
| ५ | बहुजन समाज पार्टी | ४ ÷ १३.४ | ०.२९ | -- | -- | -- |
| ६ | समाजवादी पार्टी | १ ÷ १३.४ | ०.०७ | -- | -- | -- |
| ७ | अपक्ष | १ ÷ १३.४ | ०.०७ | -- | -- | -- |
| | एकुण | | | ३ | २ | ५ |

तरी मा.महापौर साो यांचे आदेशानुसार वरील मुल्य महासभेस कळविणेस मान्यतेस्तव सादर

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २००७ अन्वये )**

**नामनिर्देशित सदस्य पदासाठी नामनिर्देशन.**
**---*---**

मी ..................................................................पक्षाचा / गटाचा गटनेता / पक्षनेता याव्दारे श्री./श्रीमती. ............................................................................ यांची **नामनिर्देशित सदस्य पदी** नियुक्तीसाठी शिफारस करीत आहे.

स्वाक्षरी .......................

(नांव :...................................................)

गटनेता/पक्षनेता ...................... पक्ष

---

सदर नामनिर्देशन पत्र दिनांक / /२०२० रोजी सकाळी .................... वाजतां प्राप्त झाले.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २००७ अन्वये )**

**नामनिर्देशनासाठी अर्हता .**

**---*---**

पुढीलपैकी कोणत्याही शर्तीची पूर्तता करणारी कोणतीही व्यक्ती नामनिर्देशित सदस्याच्या पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशित केली जाण्यास पात्र असेल -

**(क)** राज्यात मान्यताप्राप्त व नोंदणीकृत वैद्यक व्यवसायी म्हणून किमान पाच वर्षे काम केलेली असेल, किंवा

**(ख)** किमान पाच वर्ष शिक्षणतज्ज्ञ म्हणून काम केलेली असेल, यामध्ये मान्यताप्राप्त शाळा किंवा महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापक, व्याख्याता, मुख्याध्यापक यांचा समावेश असेल, किंवा

**(ग)** सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल म्हणून कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव धारण केलेली असेल, किंवा

**(घ)** कमीत कमी पाच वर्षांचा व्यावसायिक अनुभव असलेली मान्यताप्राप्त विद्यापीठाची अभियांत्रिकी पदवीधारक असेल, किंवा

**(ड)** राज्यात कमीत कमी पाच वर्षाकरीता अभिवक्ता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायद्यामधील पदवी धारक व राज्यात विधी क्षेत्रात काम करण्याचा कमीत कमी पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल, किंवा

**(च)** नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचा सहाय्यक आयुक्त किंवा उपायुक्त म्हणून काम करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली किंवा ती किमान दोन वर्षांचा अनुभव असलेली महानगरपालिकेतून आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालेली असेल, किंवा

**(छ)** महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रात कार्यरत असणा-या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० खाली नोंदणीकृत समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेची पदाधिकारी म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल.